MHKO100007902015 **नियमीत दिवाणी दावा क्र. १८७/२०१५**

आक्काताई सुतार व इतर.
विरुध्द
संतोष बुरुड.

**निशाणी क्र.२९ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला "उलटतपास नाही" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर कामी वादी यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.२४ अन्वये दिनांक २३/०२/२०२१ रोजी दाखल केले आहे. त्यानंतर सदर प्रकरण निशाणी क्र.२४ चे उलटतपासावर ठेवण्यात आले. प्रतिवादी यांना संधी देऊन देखील त्यांनी उलटतपास घेतला नाही, त्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक ११/०७/२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरण हे साक्षीदाराचे उलटतपासाकरीता ब-याच काळापासून प्रलंबीत आहे. त्याबाबत प्रतिवादी यांनी असे कारण नमुद केले आहे की, प्रतिवादी यांचेकडून योग्य ती माहिती व कागदपत्रे वकीलांना देता आले नाही, त्यामुळे प्रतिवादी यांना न्यायालयात हजर राहून वकीलांची भेट घेऊन उलटतपास घेता आला नाही असे कारण नमुद केलेल आहे. परंतु, प्रकरणाची परिस्थिती व नमुद कारण पाहता सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली काढणेकरीता प्रतिवादी यांना बचावाची संधी देणेदेखील योग्य वाटते. प्रतिवादी यांचेमुळे झालेला विलंब व त्यामुळे वादी यांचे झालेले नुकसान याकरीता सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी पुढील तारखेपर्यंत साक्षीदार यांना अदा करावी. तसे न झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.10.17 17:29:26 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १७/१०/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 17/10/2023 |
| Order signed by P.O. on | 17/10/2023 |
| Order uploaded on | 17/10/2023 |